# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२ ३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

क्रमांक: शुनिप्रा/सूचना/ 9४५५ /२०२५ — दिनांक : ०७/११/२०२५

## दरपत्रक सूचना

प्राधिकरणाच्या दि. १५/१०/२०२५ (भाग-ब) बैठकीच्या निर्णयानुसार महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२४-२५ प्रस्तावांच्या हार्ड कॉपी रद्दीत काढण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर प्रस्तावांची संख्या अंदाजे ६००० (पान संख्या अंदाजे ५०० प्रति प्रस्ताव) आहे. करिता इच्छुक पुरवठादाराने खालील नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार आपले दरपत्रक सिलबंद लिफाफयामध्ये दि. १४/११/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेच्या आंत प्राधिकरण कार्यालयात पाठविण्यात यावे. तद्नंतर दरपत्रक प्राप्त झाल्यास विचारात घेण्यात येणार नाहीत.

१) सर्व इच्छुक ठेकेदारांनी रद्दीचा प्रति किलो दर नमूद करावा.

२) रद्दी विक्री खरेदीबाबतचे license असणे आवश्यक आहे व अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) एकूण विक्री किंमतीवर लागू असलेले सर्व प्रकारचे कर (Taxes e.g. Income Tax, GST or any other taxes) यशस्वी खरेदीदारासच भरावे लागतील.

४) रद्दीकरिता वापरण्यात येणारा वजनकाटा Digital व प्रमाणित असल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

५) सर्व रद्दी आणि इतर साहित्याचे loading, uploading, वाहतूक, वजनकाटा/तोलाई, रद्दी Shredding हाताळणी, हमाल, मजूरी ईत्यादीचा सर्व खर्च खरेदीदारानीच करावयाचा आहे. वरील सर्व साहित्याची कार्यालयातून वाहतूक करताना कार्यालयामार्फत कोणतेही वाहन, हमाल/मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाणार नाही अथवा त्याकरिता कोणतेही खर्च दिला जाणार नाही.

६) यशस्वी ठेकेदाराने कार्यालयामार्फत खरेदी/विक्रीचे आदेश प्राप्त झाले नंतर आणि बयाणा रक्कम रु. २५,०००/- जमा केल्यानंतर पंधरा दिवयांच्या आत सर्व साहित्य उचलणे आवश्यक आहे. जर ठेकेदाराने विहित कालावधीत साहित्य उचलेले नाही तर अशा ठेकेदाराचे रक्कम जप्त करण्यात येवून, त्यांना देण्यात आलेला खरेदी/विक्रीचे आदेश रदद् समजण्यात येईल.

७) सर्व प्रकारची रद्दी पोत्यात भरुन काळजीपूर्वक नेण्याची जबाबदारी यशस्वी ठेकेदाराची असेल. वाहतुकी दरम्यान सदर साहित्य चोरी गेल्यास अथवा रोडवर पडलेली आढळल्यास अथवा इतरत्र सापडल्यास किंवा अनाधीकृतपणे विक्रीला दिल्यास कंपनीवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. सदर साहीत्यांची गोपनीयता राखण्याची जबाबदारी ही खरेदीदाराची राहील.

८) यशस्वी ठेकेदाराने रददी आणि इतर साहित्य कार्यालयाबाहेर नेल्यानंतर त्यांच्या विल्हेवाटीची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित खरेदीदाराची राहील. कोणत्याही परिस्थितीत रददी खुल्या बाारात विकली जाणार नाही, असे आढळल्यास त्यांच्यावर शासकीय नियमाुवार कार्यवाही करण्यात येईल.

९) यशस्वी ठेकेदाराने ही सर्व रददी फक्त कागद बनवण्याच्या पुर्नवापर कामासाठीच पेपर मिल यांना विकणे बंधनकारक असून, यासर्व रददी कार्यालयाबाहेर नेल्यानंतर त्यांचा वापर पेपर मिलकडून कागदाचा लगदा तयार करण्यासाठीच करण्यात आलेला आहे याबाबतचा प्रमाणपत्र पेपर मिलकडून एका महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील, त्यानंतरच खरेदीदारास अनामत रक्कम/सुरक्षा रक्कम परत करण्यात येईल. अनामत रक्कम/बयाणा रक्कम यांचेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

१०) यशस्वी ठेकेदारास सर्व साहित्याचे वजन झाल्यानंतर त्यांची दर पत्रकानूसार एकूण मुल्य रक्कमाचा धनादेश कार्यालयात जमा करावा लागेल. एकूण मूल्य रक्कम/रक्कमेचा धनादेश जमा केल्यानंतरच ठेकेदारास रददी व इतर साहित्य कार्यालय बाहेर नेण्यास परवानगी देण्यात येईल.

११) ठेकेदारांना प्रस्तावांच्या रददीची पाहणी करावयाची असल्यास प्राधिकरण कार्यालयात दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत येऊ शकतात.

१२) सदरील प्राप्त निविदा स्विकारणे/नाकारणे याबाबतचे अधिकार मा. सदस्य सचिवांस असतील.

सूचनेतील सर्व अटी मान्य असणेबाबतचे प्रमाणपत्र, खरेदी-विक्रीचे license तसेच दरपत्रक बंद लिफाफयात देणे आवश्यक आहे.

**नितीन पाठक**
**अवर सचिव**
**शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई**